* माहितीक*

# वाशिम जिल्हा पोलीस दल

visit as http://www.washimpolice.org

प्रेस नोट

---

दिनांक १७/०८/१९

**वाशिम जिल्हा पोलीस दलातर्फे .१७ व्या अमरावती परिक्षेत्रिय कर्तव्य मेळाव्याचे आयोजन.**

पोलीस दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कौशल्याची चाचणी घेण्यासाठी व व्यावसायीक गुणवंत्ता सुधारण्यासाठी महत्वाचा ठरणारा १७ वा अमरावती परिक्षेत्रिय पोलीस कर्तव्य मेळाव्याचे आयोजन करण्याचा बहुमान यंदा वाशिम जिल्हा पोलीस दलाला मिळालेला आहे. गतवर्षी बुलढाणा येथे पार पडलेल्या १६व्या पोलीस कर्तव्य मेळाव्यात ४ सुर्वण,२रौप्य, ३ कास्य पदक वाशिम जिल्हा पोलीस दलाने पटकावली होती.

अमरावती परिक्षेत्र कर्तव्य मेळाव्या करीता पोलीस अधिक्षक श्री. वसंत परदेशी सो यांनी पुर्वतयारी करीता वेगवेगळया समित्यांचे आयोजन करुन आढावा घेतला व पोलीस कर्तव्य मेळावा उत्कृष्टरित्या पार पडावा याकरीता अधिकारी कर्मचारी यांना मार्गदर्शन केले.

सदर कर्तव्य मेळाव्याचे आयोजन दिनांक १९/०८/२०१९ ते दिनांक २१/०८/२०१९ या कालावधी मध्ये वाशिम पोलीस मुख्यालय येथे होणार असुन सदर स्पर्धेमध्ये अमरावती परिक्षेत्रातील ०५ जिल्हे समाविष्ठ होणार आहेत. सदर स्पर्धेमध्ये एकुण ०६ मुख्य विषयावरील २१ प्रकारच्या परिक्षा होणार असुन त्यामध्ये शास्त्रोक्त पध्दतीने तपास पध्दती, तपासामध्ये संगणकांचा वापर, श्वान पथक स्पर्धा, पोलीस फोटोग्राफी, पोलीस व्हिडीओग्राफी व बॉम्ब शोधक व नाशक पथकाच्या स्पर्धा होणार आहेत. स्पर्धेकरीता अमरावती ग्रामिण, अकोला, यवतमाळ, बुलढाणा व वाशिम जिल्हयातील पोलीस अधिकारी कर्मचारी असे एकुण ११२ स्पर्धक ज्यामध्ये ३२ अधिकारी व ८० कर्मचारी, तसेच पर्यवेक्षक म्हणुन बाहेर जिल्हयातील ०९ व वाशिम जिल्हयातील ११ अधिकारी कामकाज पाहणार आहेत. सदर स्पर्धेमध्ये पदक विजेत्या स्पर्धकास पुढे होणाऱ्या राज्य पोलीस कर्तव्य मेळाव्या सहभागी होता येणार आहे. सदर कार्यक्रमाचे उदघाटन मा. जिल्हाधिकारी साहेब श्री. हृषिकेश मोडक यांच्या हस्ते होणार आहे.

17/8/19

पोलीस निरिक्षक

स्थानिक गुन्हे शाखा, वाशिम